महाराष्ट्र पोलीस

पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००

E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in

---

**प्रेसनोट** दिनांक : ०१/११/२०२३

## नाशिक ग्रामीण पोलीसांचे अवैध व्यवसाय विरोधी अभियान
## ७६४ ठिकाणी छापे, चार कोटी चोवीस लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त

---

नाशिक ग्रामीण पोलीसांनी जिल्ह्यातील गुटखा व्यवसायास पायबंद घालण्यासाठी यापूर्वी तीन अभियान राबविली होती. दिनांक ६/१०/२०२३ पासून जिल्ह्यातील गुटखा व्यवसाय नेस्तनाबूत करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी गुटखा विरोधी अभियान - ४ सुरु केले होते.

दिनांक ६/१०/२०२३ ते दिनांक ३१/१०/२०२३ या तीन आठवड्यात नाशिक ग्रामीण पोलीसांनी गुटखा विरोधी १०७ कारवाया करुन ११० आरोपींना भारतीय दंड संहितेच्या कलम ३२८ खाली अटक केली आहे. सदर कारवायात एकूण १ कोटी ७६ लक्ष ४२ हजार ६८३ रुपयांचा गुटखा हस्तगत करण्यात आला आहे.

गुटखा व्यवसायाबरोबरच जिल्ह्यातील सर्व प्रकारचे अवैध व्यवसाय बंद व्हावेत या दृष्टीकोनातून नाशिक ग्रामीण पोलीसांनी याच कालावधीत वेगवेगळया सदराखाली एकूण ७६४ ठिकाणी छापे मारुन सर्वच प्रकारच्या अवैध व्यवसायांवर कारवाई केली आहे. यात गुटखा कारवाईच्या १०७ केसेससह मुंबई दारुबंदी कायद्याखाली ५०५, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्याखाली १०१, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमाखाली ३८, जीवनावश्यक वस्तू कायद्याखाली १०, अंमली पदार्थ विरोधी कायद्याखाली ३ कारवायांचा समावेश असून, यात एकूण ९७८ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून एकूण ४ कोटी २४ लक्ष रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अ.क्र. | कारवाई | केसेसची संख्या | आरोपी संख्या | हस्तगत मुद्येमाल |
|---|---|---|---|---|
| १ | गुटखा केसेस | १०७ | ११० | १,७६,४२,६८३/- |
| २ | मुंबई दारूबंदी कायदा | ५०५ | ५१४ | ८९,८६,०६१/- |
| ३ | महाराष्ट्र जुगार कायदा | १०१ | २७४ | २५,३९,२२२/- |
| ४ | प्राणी संरक्षण कायदा | ३८ | ५८ | १,१८,९७,५६०/- |
| ५ | जिवनावश्यक वस्तु कायदा | १० | १६ | ११,४८,५७०/- |
| ६ | एन.डी.पी.एस. कायदा | ३ | ६ | १,९५,९३०/- |
| | **एकुण** | **७६४** | **९७८** | **४,२४,१०,०२६/-** |

जिल्हयातील सर्व अवैध व्यवसाय हद्दपार करण्यासाठी अशा व्यवसायांची माहिती पोलीसांपर्यंत पोहोचावी, या दृष्टिकोनातून नाशिक ग्रामीण पोलीसांनी खबर ही हेल्पलाईन सुरु केली असून, नागरिकांनी ६२६२ २५ ६३६३ या हेल्पलाईनवर संपर्क साधून आपल्या परिसरात चालणा-या अवैध व्यवसायांची माहिती नाशिक ग्रामीण पोलीसांना द्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.